P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक – ११/०७/२०२४

## दि. १०/०७/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ७९७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५), ३२४ (४)/(५) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०७/२०२४ रोजी ००.४५ वा. साई सलून समोर श्री गणेश कॉलनी, ज्योतीबानगर, पी सी एम सी शाळेजवळ, काळेवाडी गावठाण काळेवाडी पुणे.

गुन्हा दाखल :- दि १०/०७/२०२४ रोजी २३.५१ वा

फिर्यादी :- सतिश रामकेवल यादव वय ३० वर्षे, धंदा व्यवसाय, रा. श्री गणेश कॉलनी, ज्योतीबानगर, पी सी एम सी शाळेज काळेवाडी गावठाण काळेवाडी पुणे.

आरोपी :- १) अंशु जॉर्ज किपलिंगकर वय अंदाजे २३ वर्षे रा. काळेवाडी पुणे २) आर्यन रमन पवार वय १९ वर्षे रा. सदर, ३) करण रवी पटेकर वय २५ वर्षे रा. पत्ता माहित नाही.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ ते ३ यांनी मोठमोठयाने आरडा ओरड करुन गाडयांच्या काचा फोडत होते. म्हणून फिर्यादीने त्यांना का तोडफोड करीत आहात असे विचारले असता आरोपी क्र ३ याने फिर्यादीची गचांडी पकडून म्हणाला की, “ तु मला ओळखत नाहीस का, मला करण पटेकर म्हणतात.” असे म्हणुन याला पकडा रे असे म्हणाला असता आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादीस पकडुन आरोपी क्र ३ याने फिर्यादीचे बरमुडयाचे उजव्या खिशात हात घालुन जबरदस्तीने खिशातील रोख रक्कम ६५०/- रुपये काढुन घेतले. त्यावेळी फिर्यादी त्यांना म्हणालो की, तुम्ही माझे पैसे जबरदस्तीने घेतले आहेत. परंतु माझ्या या औरा गाडीला दगड मारुन माझे औरा कार नं एम एच १४ एल बी ८४६७ चे नुकसान करु नका असे म्हणताच आरोपी क्र ३ याने फिर्यादीचे गाडीचे पाठीमागील काचेवर सिमेंटचा गट्टू फेकून मारुन गाडीची पाठीमागील काच फोडली. तसेच आरोपी क्र २ याने तोच सिमेंटचा गट्टु घेवून हातात धरुन गाडीचे पुढचे काचेवर मारला. तसेच त्याच गट्टुने त्यांनी इतर गाडयांच्या काचा फोडून नुकसान केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि पोटे ९७६६२६४२६६

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी ४३१/२०२४ भादवि कलम ४२०,४०९, ४६७,४६८, ४७१,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २५/१०/२०१९ ते १८/०१/२०२० चे दरम्यान स्टेट बँक ऑफ इंडीया, औद्योगिक वित्त शाखा, कलासागर हॉटेल समोर, पिंपरी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१०/०७/२०२४ रोजी २३.०६ वा

फिर्यादी :- श्री बिभिषण व्यंकटराव गायकवाड वय ५३ वर्षे रा. सेक्टरनं. २५,प्लॉट नं. ४५८, निगडी प्राधीकरण पुणे ४११०४४, ९०११०६१२६२

आरोपी :- १) शाहबाज जफर सय्यद मोहमंद जफर, रा.ठी. फ्लॅट नं ५०२, लोढा, गहूंजे, ता मावळ,जि.पुणे मो.नं. ९३०९०६९५५७
२) श्री विजय अरविंद रायकर, वय ४६ वर्षे, व्यवसाय - बांधकाम व्यवसायीक, रा.ठी. सर्व्हे नंबर ३३, सुमेरु बंगलो, माणिक बाग, सिंहगड रोड, पुणे ९७६३७२१७०७
३) श्री. गौरव सुनिल सोमाणी वय ३५ वर्षे व्यवसाय - बांधकाम व्यवसाईक रा.ठि. - ३रा मजला सी बिल्डींग, सोबा सवेरा, बिबवेवाडी, पुणे ३७ ७४४७४४४४५
४) महेश भगवानराव नलावडे. पत्ता माहित नाही **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ ते २ यांनी स्टेट बँक ऑफइंडीया, औद्योगिकवित्त शाखा पिंपरी येथेरिलेशनशिप मॅनेजर या पदावर असताना, पदाचा गैरवापर करुन आरोपी क्र ३ ते ५ यांचेशी संगणमत करुन बीव्हीजी डेव्हलपर्सचे नावचे बनावट विनंतीपत्र बनवून त्यावर फिर्यादी व त्यांचा भाऊ भागीदार श्री बाळासाहेब गायकवाड यांच्या बनावट सह्या करुन, त्याद्वारेत्यांचे बीव्हीजी डेव्हलपर्स या भागीदारी संस्थेचे मंजूर मुदतकर्ज खाते

क्रमांक ३८८७१९७०८६१ या खातेमधुन वेळोवेळी रक्कम रुपये १०,१४,१८,०००/- फिर्यादी यांचे संमत्तीविना परस्पर आरोपी क्र १ ते ३ यांचे फायद्याकरीता त्यांचे वेगवेगळ्या फर्मच्या खातेवर परस्पर वळते केले, व त्यांचा फसवणूकीचा उद्देश साध्य होण्यासाठी फिर्यादी यांचे उपरोक्त लोन खात्याचे बनावट बॅक स्टेटमेंट तयार करुन त्यावर बॅकेचा शिक्का व सही करुन ते फिर्यादी यांना वेळोवेळी सादर केले. तसेच सदरचा गैरप्रकार फिर्यादी यांचे निदर्शनास आल्यानंतर फसवणूकीची रक्कम परत करण्याचे वेळोवेळी आश्वासने देवून व त्यापैकी आरोपी क्र २ याने परत केलेली रक्कम रुपये ३,२०,००,०००/- वजा करता फिर्यादी यांचे मे. बीव्हीजी डेव्हलपर्स चे एकूण रक्कम रुपये ६,९४,१८,०००/- रु. (सहा कोटी चौऱ्यांनव लाख आठरा हजार रुपये) इतक्या रकमेचा संगणमताने अपहार करुन स्वतःचे फायदयाकरीता वापरुन फिर्यादी यांची आर्थीक फसवणुककेली आहे म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि सपकळ ९५६११९५५९९

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ७९३/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२),३१८(४),३१९(२) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०४/०७/२०२४ रोजी ११/०० वा. सुमारास थेरगाव पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१०/०७/२०२४ रोजी १७.५२ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी धंदा - नोकरी, रा. थेरगाव पुणे

आरोपी :- मोबा क्र ९८१८६९७४४१ वरील इसम नाव पत्ता माहित नाही

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील मोबा क्र ९८१८६९७४४१ वरील अनोळखी इसम याने फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकावर फोन आला व त्याने सागितले की, तुमचे पार्सल मुंबई येथुन इराकला जात आहे. व त्यामध्ये ८ पासपोर्ट, ५ किलो कपडे, २ आयपॅड, ३०० ग्रॅ. एमडीएमए मिळाले आहेत. असे खोटे सांगुन त्याची खात्री करण्याकरीता फिर्यादीयांच्या मोबाईलवर skype app डाऊनलॉड करायला लावुन MH ४१६२ MUMBAI NCB DEPARTMENT ही आयडी देवुन लॉगिन करुन कॅमेराव्दारे फिर्यादीचे आधार कार्ड बघुन त्यांच्या आधार कार्डला भरपुर बँक अकाऊंट लिंक असल्याचे खोटे सांगुण स्वतःचे बँक अकाऊंटची माहिती व स्टेटमेंट घेवुन फिर्यादीचे आयसीआयसीआय बँकेच्या अकाऊंटचा नंबर घेवुन मोबाईलचे स्क्रीन शेअर करुन फिर्यादीची नेट बँकींग चालु करुन त्याव्दारे फिर्यादीचे आयसीआयसीआय बँकेचे ५,६६,३१२/- रुपयेचे लोन पास करुन त्यांनी फिर्यादीस SBIN0017403 हा आय.एफ.एस.सी.क्र. ॲड करण्यास सांगुन फिर्यादीचे अकांऊंट वरुन त्यांच्या आयसीआयसीआय बँक अकाऊंट नं. ३९९००५०००१५२ यावर १०,००,०००/- रु. ट्रान्सफर करुन घेवुन त्यांची फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि माने ८१०८८८८३५२

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी ३२१/२०२४ भादवि कलम ३७९ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २८.०६.२०२४ रोजी १७.०० ते दि. २६.०६.२०२४ रोजी ०९.०० वा. चे दरम्यान अंकुश चौक, राजविद्या केंद्राचेजवळ, निगडी पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि १०/०७/२०२४ वेळ १७.१५ वा

फिर्यादी :- युवराज रंगनाथ जाधव, वय ३२ वर्षे, व्यवसाय- ड्रायव्हिंग, रा. प्लॉट नं. १०, एच.ए. सोसायटी, अंकुश चौक, निगडी. पुणे. ८८८८७२२६६६

आरोपी :- अज्ञात चोरटा

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची २,००,०००/- रु किं.ची काळा पिवळा रंगावी पांढ-या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची वॅगनार गाडी तिचा आरटीओ नं. MH 12 QG 1176 ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुद्दाम लबाडीचे इराद्याने स्वतःचे आर्थिक फायद्याकरिता चोरुन नेली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि गायकवाड ९९२१५१२५७६

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत २८८/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम २२३, १२३, २७४,२७५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०.०७.२०२४ रोजी चे १३.५५ किवळे गाव कडुन सिंबॉयसेस कॉलेज कडे जाणारे रोडचे उजव्या बाजुस ओढा ओलांडल्या नंतर असलेल्या लेबर कॅम्प मधील किराणा दुकाणामध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/०७/२०२४ रोजी २१.५४ वा |
| फिर्यादी | :- | ज्ञानेश्वर शंकर गाडेकर, पोशि १८९८ नेम. गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | शंकरलाल मांगीलालजी देवासी वय- २० वर्षे रा. किवळे ता. हवेली जि. पुणे मुळ रा. हमीर वास पोस्ट मांडा ता. मारवाड जंक्शन जि. पाली राज्य- राजस्थान **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने शासनाने प्रतिंबंधीत केलेल्या तंबाखुजन्य पदार्थाचे सेवनाने मुखाचा कर्करोग व इतर विकार होवुन शरीराची हानी होऊ शकते हे माहीती असतांना देखील १३,३२६/- रु किंमतीचा मुद्देमाल हा विक्री करण्याचे हेतुने स्वतः जवळ बाळगुन असतांना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनिरी टार्फे ७२७६८६४४८४ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत २८९/२०२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२९, १३१ (क) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/०७/२०२४ रोजी सायं २१.१५ वा. सुमारास, ध्रुवसिध्दी बिल्डींग, मधील शॉप नं. १५ येथील नॉक नॉक कॅफे, रावेत पुणे येथील नॉक नॉक कॅफे मध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/०७/२०२४ रोजी २१.५४ वा |
| फिर्यादी | :- | पोर्णीमा गणेश चव्हाण, वय ३० वर्षे, महिला पोलीस शिपाई बक्कल नंबर ३६४३ नेमणुक रावेत पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड मोनं. ८५३०४९७४८२ |
| आरोपी | :- | कुणाल पांडुरंग राळे, वय २१ वर्षे, रा. शिवगणेश नगर, धावडे वस्ती, भोसरी, पुणे |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने नॉक नॉक कॅफे शॉपचा कोणताही परवाना नसताना नॉक नॉक कॅफे शॉपचा बोर्ड लावून खादय पदार्थ विक्री करण्याचे सार्वजनिक ठिकाणी कॉफी शॉपच्या पहिल्या मजल्यावरील रुममध्ये ०३ बाय ०३ लांबी रुंदीचे प्लायवुडचे व सुमारे पाच फुट उंचीचे ०७ कप्पे असून त्यांना अनुक्रमे १ ते ७ क्रमांक दिलेले असून, त्यास बाहेरचे बाजुने पडदे लावून आतमध्ये बसण्यासाठी सोफे ठेवुन मुलामुलींना बसण्यासाठी व अश्लिल चाळे व बेशिस्त वर्तन करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/६७५ गायकवाड ८१४९३८६२९९ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ८४२ /२०२४ भा.न्या. संहिता कलम ३२५ व प्राण्यासनिदर्यतेने वागवण्यास प्रति अधि १९६० चे कलम ११(१) (क) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०९/०७/२०२४ रोजी रात्रौ २३/०० वा.चे सुमारास आमचे आयटेन्ट होम सोसायटी फेज- २ माण हिंजवडी येथे गेटसमोर |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/०७/२०२४ रोजी १६.०१ वा |
| फिर्यादी | :- | नियती मधुरेंद्र रॉय सिंहा वय ३६ वर्षे धंदा नोकरी रा. ई-१०४, आयटेन्ट होम सोसायटी फेज- २ माण हिंजवडी ८८००७२९००८ |
| आरोपी | :- | स्वप्नील रामचंद्र कुंभार रा. कोथरुड पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या र्यादी या प्राणी मित्र असून, त्या गेले ८ वर्षापासून अनिमल वेलफेअर ऑफ इंडिया येथे काम करीत आहे यातील आरोपी मजकुर याने त्याचे ताब्यातील वाहन कार नं एमएच १२ एमएल ३२७९ हिने रोडवरील कुत्र्यास वय अंदाजे दिड महिना यास धडक दिल्याने सदर कुत्रा अपघातात ठार झाला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि ताकतोडे ९९२२५००८३२ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३३८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५ (ब) सह मो.वा.का.क १३४(अ) ११९/१७७ ,१८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/०७/२०२४ रोजी सांय ०५/३० वा.चे सुमा ओझोन निलय सोसायटी, नविन डीमार्ट जवळ, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे येथे रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/०७/२०२४ वेळ १७.३८ वा |
| फिर्यादी | :- | अनिल शिवाजी जाधव, वय ३३ वर्ष, व्यवसाय बांधकाम व्यवसाय, रा.फलॅट नं.३०६, ओझोन निलय सोसायटी, नविन डीमार्ट जवळ, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे ९८३४९८४९३७ |
| आरोपी | :- | संदीपविठ्ठलराव देवकर, रा.आय.आर.बी प्लॉट मंगरूळ, ता. मावळ, जि.पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा वय ७ वर्ष, हा मुला सोबत खेळत असलेला बॉल सोसायटीचे गेटचे समोरील रोडवरून घेवुन आतमध्ये येत असताना त्यावेळी चारचाकी गाडी नं.एम.एच.०४ एच.डी.०५६९ हीचे वरील चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील गाडी भरधाव वेगाने वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करून चालवुन फिर्यादी यांचा मुलगा वय ७ वर्षे याचे उजव्या पायाच्या पंजावर घालुन गंभीर दुखापत करून वैदयकीय सेवा न पुरविता निघुन गेला आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मुल्ला मो नं ९४०३०७१५७८ |